# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** भारतीय राष्ट्रीय कृषक उपज उपार्जन प्रसंस्करण एंव रिटेलिंग सहकारी
**{स्थावर विभाग}** संघ मर्यादित (नॅकॉफ) यांना जेनेरिक औषधी केंद्र सुरू करण्यासंदर्भाने अकरा महिन्याकरीता पाचपावली म.न.पा. दवाखाना/रुग्णालय येथे जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या सर्व शासकीय रूग्णांलयांतर्गत नॅकोफ इंडीया लिमिटेड (NACOF) या संस्थेस जेनेरिक औषधी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यासंबंधाने महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : जनऔ-२०२३/प्र.क्र.१०७/आरोग्य-३ दि. ३१ जुलै, २०२३ अन्वये, भारत सरकारच्या प्रधानमंत्री जन औषधी केंद्र या योजनेतंर्गत गोर-गरिबांना स्वस्तात औषधे उपलब्ध व्हावे म्हणून जेनेरिक औषधालय योजना सुरू करण्यात आली आहे. राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या आरोग्य रूग्णांलयाच्या परिसरात नगर विकास विभागाच्या धर्तीवर जेनेरिक औषधी केंद्र सुरू करण्यास परवानगी मिळण्याबाबत नॅकोफ इंडीया लिमिटेड, (NACOF) नवी दिल्ली या संस्थेने विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने भारतीय राष्ट्रीय कृषक उपज उपार्जन प्रसंस्करण एंव रिटेलिंग सहकारी संघ मर्यादित (नॅकॉफ) तर्फे श्री. मनोज कुमार गुप्ता यांनी मा. आयुक्त महोदयांना जेनेरीक औषधी केंद्राकरीता दवाखान्याच्या परिसरातील प्रथमदर्शनी भागात जागा उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर प्रकरणात, नगर रचना विभागाचे आकारणी नुसार Ready Reckoner दर प्रमाणे येणाऱ्या जागेच्या मुल्यांवर ८% प्रमाणे आकारणी नुसार वार्षिक भाडे यानुसार जागेचे क्षेत्र १६'-००" X १५'-००" = २४०.०० चौ.फुट / २२.२९ चौ.मी. Ready Reckoner दर रू. ३२,२००/- प्रति चौ.मी. याप्रमाणे एकुण ११ महिने कालावधीकरीता रू. ५२,६३५/- शुल्काची आकारणी खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

कमाल चौक, पाचपावली दवाखान्यात असलेल्या खुल्या जागेबाबत.

१. Ready Reckoner Rate रू. ३२,२००/- प्रति चौ.मी.
२. जागेचे क्षेत्रफळ १६'-००" X १५'-००" = २४०.०० चौ.फुट / २२.२९ चौ.मी.
३. नगर रचना विभागाचे आकारणी नुसार ८% प्रमाणे

२२.२९ चौ.मी. X रू. ३२,२००/- X ८% = रू. ५७,४१९/- वार्षिक दर
रू. ५७,४१९ / १२ = रू. ४,७८५/- प्रति महा दर
११ महिनेकरीता :- रू. ४,७८५/- X ११ महिने = रू. ५२,६३५/-
एकुण ११ महिन्याचे शुल्क रू. ५२,६३५/-आकारण्यात आलेले आहे.

नॅकोफ इंडीया लिमिटेड शाखा, मुंबई यांना नागपूर म.न.पा. अंतर्गत असलेल्या कमाल चौक, पाचपावली येथील रुग्णालयाच्या परिसरात विषयांकित नमुद जागेत जेनेरिक औषधी केंद्र सुरु करण्याकरिता जागा द्यावयाचे झाल्यास खालील अटी व शर्ती बधंनकारक राहतील.

अ) प्रशासकीय अटी व शर्ती :-

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (क) च्या तरतुदीनुसार ठरावाच्या माध्यमातून महानगरपालिकेची मंजूरी आवश्यक आहे.
२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) च्या तरतुदीनुसार जो मोबदला घेऊन विषयांकीत जागा पट्टयाने दयावयाची आहे त्याचे भाडेमुल्य चालू बाजार किमतीपेक्षा कमी नसावे.
३. याबाबत संबंधित संस्थेबरोबर अटी व शर्ती नुसार योग्य तो करारनामा व जागा निश्चिती करण्याबाबतची कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना राहील.
४. वीज वापरासाठी स्वतंत्र मीटर बसविणे नॅकोफ इंडिया लिमिटेड या संस्थेस बंधनकारक असेल. त्याअनुषंगाने येणारी देयके अदा करणे त्या संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच सदर जेनेरीक औषधाच्या केंद्रातील सामान व साहित्य सामुग्रीच्या सुरक्षेची जबाबदारी संस्थेचीच राहील.

५. जन औषधी उपलब्ध नसल्यास इतर बँडेड अथवा जेनरिक औषधी सदर संस्थेने उपलब्ध करून दयावी लागतील अशा वेळी ब्रँडेड औषधीच्या दर्शनी मुल्यावर ५% इतकी सवलत रुग्णांना देणे बंधनकारक राहील.

६. औषधी केंद्रास जागा अन्न व औषध प्रशासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे उपलब्ध करून देण्यात यावी.

ब) तांत्रिक अटी व शर्ती :-

१. संबंधित जिल्ह्याचा जिल्हा शल्यचिकित्सकाने रुग्णालय स्तरावर आवश्यक त्या अधिकारी / कर्मचारी व अन्न व औषध प्रशासनाचा प्रतिनिधी यांची एक समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती संबंधित संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या औषधी केंद्राचे कामकाजाचा दर एका वर्षांनी आढावा घेण्यात येईल. आणि त्याबाबतचा अहवाल आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना पाठविल.

२. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या नियमाप्रमाणे ज्या ठिकाणी औषध व्यवसाय करणे प्रस्तावित आहे. त्याच जागेसाठी विक्री परवाना घेणे बंधनकारक राहील.

३. संस्थेने नेमलेल्या औषध निर्मात्याने राज्याच्या फार्मसी कौन्सीलकडे नोंदणीकृत असणे व वेळोवेळी नोंदणी अद्ययावत करणे बंधनकारक राहील.

४. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या नियमाप्रमाणे पुरेशी जागा व औषधे साठविण्यासाठी वातानुकूलित व्यवस्था असणे आवश्यक आहे.

५. औषधांची विक्री करताना नॅशनल फार्मास्युटीकल प्रायसिंग अथॉरिटी च्या नियमाप्रमाणे किंमतीचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर औषधांच्या दुकानामध्ये बाहेरून येणाऱ्या प्रत्येक औषधांची नोंद नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे. तांत्रिक समितीकडून अशा नोंदवहीतील नोंदी व प्रत्यक्ष साठा यांची पडताळणी अधुनमधून करण्यात येईल.

७. नियुक्त केलेल्या तांत्रिक समितीकडून वरील सर्व तांत्रिक बाबींचे व नियमांचे काटेकोरपणे पालन होत असल्याबाबत सहामाही तपासणी करण्यात येईल व त्याचा अहवाल आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना सादर करावा.

८. औषध खरेदी, विक्री, साठवणूक, आवश्यक आर्थिक गुंतवणूक व त्या अनुषंगाने केंद्र चालविण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभी करण्याची जबाबदारी व त्यांच्या नियमातील तरतूदीनुसार या नॅकोफ इंडिया लिमिटेड या संस्थेची राहील.

क) इतर अटी व शर्ती :-

१. भाडे कराराचा कालावधी ११ महिन्याकरीता राहील.

२. जेनेरीक औषधीचे केंद्र तात्पुरत्या स्वरूपातील बांधकाम/ टिन शेड/ ॲल्युमिनियम शेड चे राहील.

३. ११ महिन्यानंतर भाडेकराराची मुदतवाढ करावयाची झाल्यास पुढील ११ महिन्याचे येणाऱ्या शुल्क/भाडे दरात १०% वाढ किंवा त्या चालु आर्थिक वर्षाच्या सिध्द शिघ्र गणकानुसार आकारण्यात आलेल्या दरा प्रमाणे यापैकी जे कमाल दर असतील त्या दरापासून आकारणी करण्यात येईल.

४. अर्जदार संस्थेस सदर जागेवरील औषधी केंद्र बंद करावयाचे असल्यास भाडेपट्टा रद्द करण्याबाबत तीन महिने पुर्वी महानगरपालिकेला सुचित करणे आवश्यक राहील.

५. म.न.पा. अंतर्गत सुरु असलेल्या दवाखान्यात, रुग्णालय परिसरात दुकान संबंधाने म.न.पा. व नॅकॉफ सोबत झालेल्या करारात वाद उपस्थित झाल्यास दोन्ही पक्ष सामंजस्याने वाद सोडविण्याचे प्रयत्न करतील पण तरीही निर्माण झालेला वाद सुटला नाही तर संबंधीत वाद मा. आयुक्त यांच्या समक्ष ठेवण्यात येईल व त्यांनी दिलेल्या निर्णय दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील.

६. अर्जदारसंस्थेस भाडेकरार नियमीत/सुरु झाल्यानंतर सदर्हु जागेत स्वतंत्ररित्या विजेचा पुरवठा अर्जदारसंस्थेस स्वतंत्ररित्या करुन घ्यावी लागेल. यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

७. नॅकॉफ यांनी ज्या रुग्णालयात जेनेरिक औषधी केंद्र सुरु केले आहे, तेथील वैद्यकीय अधिकारी त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित रुगालायातील औषध भांडार प्रमुख, प्रशासकीय अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभागाचा प्रतिनिधी असलेली समिती स्थापन करतील व ही समिती संस्थेच्या

वतीने चालविण्यात येणाऱ्या औषधी केंद्राचा कामकाजाचा दर वर्षांनी आढावा घेईल व त्याबाबतचा अहवाल मा. आयुक्त नागपूर महानगरपालिका यांचे मार्फत शासनास करण्यात येईल.

८. नॅकॉफ यांनी कामाच्या ठिकाणी काही दुर्घटना, अपघात अथवा गैरप्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित व्यवस्थापक, नॅकॉफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई संस्थेची राहील. त्याकरिता नागपूर महानगरपालिका कोणती ही नुकसान भरपाई, वैद्यकीय मदत अथवा आर्थिक मदत करणार नाही. जेनेरिक औषधीच्या केंद्राची उभारणी करतेवेळी नागपूर महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई व्यवस्थापक, नॅकॉफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई संस्थेने करावयाची आहे.

९. नॅकॉफ संस्थेस ठरवून दिलेली मुदत संपुष्टात येईपर्यंत काम करणे बंधनकारक राहील.

१०. महाराष्ट्र शासन, केंद्र शासन तसेच मा. न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे, शासन निर्णयाचे परिपत्रक व आदेशाचे पालन करण्याची जवाबदारी व्यवस्थापक, नॅकोफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई या संस्थेची व नागपूर महानगरपालिका नागपूर यांची असून उक्तप्रमाणे वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार जेनेरिक औषधी पुरवठा करण्याचे अंमलबजावणी करणे व्यवस्थापक, नॅकोफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई यांचेवर बंधनकारक असेल.

११. सदरील करारनामा नागपूर न्यायक्षेत्राच्या आधीन राहून करण्यात येत आहे.

१२. नॅकोफ यांनी भाडयावर दिलेल्या जागेवर पोट भाडेकरू इत्यादी म.न.पा.च्या पूर्व परवानगीशिवाय ठेवू नये.

१३. दिलेल्या जागेत अर्जदारास बांधकाम स्थायी/अस्थायी करावयाचे असल्यास त्याबाबत नियमानूसार पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

१४. उपरोक्त अटी व शर्तीचे पालन व्यवस्थापक, नॅकोफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई या संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच या करारातील अटी व शर्तीचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास उचित कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना राहतील.

१५. शासनाच्या आरोग्य संस्थामधील औषधे व NACOF च्या औषधी केंद्रातील औषधांमध्ये अदलाबदल तसेच परस्पर औषधांचा साठा संपला म्हणून काळाबाजार होणार नाही याची दक्षता घ्यावी, याचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास NACOF या संस्थेस काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल".

उक्त प्रमाणे नॅकॉफ यांना संबंधीत उक्त शासन निर्देशाचे अनुषंगाने जेनेरीक औषधी केंद्राकरीता रू. २६,४७७/- शुल्क/भाडे आकारून ११ महिन्याकरीता कमाल चौक, पाचपावली येथील रुग्णालयाच्या परिसरातील जागा उपलब्ध करून देणेबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 60/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 15/03/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, स्थावर विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार भारतीय राष्ट्रीय कृषक उपज उपार्जन प्रसंस्करण एंव रिटेलिंग सहकारी संघ मर्यादित (नॅकॉफ) यांना जेनेरिक औषधी केंद्र सुरू करण्यासंदर्भाने अकरा महिन्याकरीता पाचपावली म.न.पा. दवाखाना/रुग्णालय येथे जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रश्न विचारात घेऊन,

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या सर्व शासकीय रूग्णांलयांतर्गत नॅकोफ इंडीया लिमिटेड (NACOF) या संस्थेस जेनेरिक औषधी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यासंबंधाने महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : जनऔ-

२०२३/प्र.क्र.१०७/आरोग्य-३ दि. ३१ जुलै, २०२३ अन्वये, भारत सरकारच्या प्रधानमंत्री जन औषधी केंद्र या योजनेतंर्गत गोर-गरिबांना स्वस्तात औषधे उपलब्ध व्हावे म्हणून जेनेरिक औषधालय योजना सुरू करण्यात आली आहे. राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या आरोग्य रूग्णांलयाच्या परिसरात नगर विकास विभागाच्या धर्तीवर जेनेरिक औषधी केंद्र सुरू करण्यास परवानगी मिळण्याबाबत नॅकोफ इंडीया लिमिटेड, (NACOF) नवी दिल्ली या संस्थेने विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने भारतीय राष्ट्रीय कृषक उपज उपार्जन प्रसंस्करण एंव रिटेलिंग सहकारी संघ मर्यादित (नॅकॉफ) तर्फे श्री. मनोज कुमार गुप्ता यांनी मा. आयुक्त महोदयांना जेनेरीक औषधी केंद्राकरीता दवाखान्याच्या परिसरातील प्रथमदर्शनी भागात जागा उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली आहे.

सदर प्रकरणात, नगर रचना विभागाचे आकारणी नुसार Ready Reckoner दर प्रमाणे येणाऱ्या जागेच्या मुल्यांवर ८% प्रमाणे आकारणी नुसार वार्षिक भाडे यानुसार जागेचे क्षेत्र १६’-००” X १५’-००” = २४०.०० चौ.फुट / २२.२९ चौ.मी. Ready Reckoner दर रू. ३२,२००/- प्रति चौ.मी. याप्रमाणे एकुण ११ महिने कालावधीकरीता रू. ५२,६३५/- शुल्काची आकारणी खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

कमाल चौक, पाचपावली दवाखान्यात असलेल्या खुल्या जागेबाबत.

१. Ready Reckoner Rate रू. ३२,२००/- प्रति चौ.मी.

२. जागेचे क्षेत्रफळ १६’-००” X १५’-००” = २४०.०० चौ.फुट / २२.२९ चौ.मी.

३. नगर रचना विभागाचे आकारणी नुसार ८% प्रमाणे

२२.२९ चौ.मी. X रू. ३२,२००/- X ८% = रू. ५७,४१९/- वार्षिक दर

रू. ५७,४१९ / १२ = रू. ४,७८५/- प्रति महा दर

११ महिनेकरीता :- रू. ४,७८५/- X ११ महिने = रू. ५२,६३५/-

एकुण ११ महिन्याचे शुल्क रू. ५२,६३५/-आकारण्यात आलेले आहे.

नॅकोफ इंडीया लिमिटेड शाखा, मुंबई यांना नागपूर म.न.पा. अंतर्गत असलेल्या कमाल चौक, पाचपावली येथील रुग्णालयाच्या परिसरात विषयाकिंत नमुद जागेत जेनेरिक औषधी केंद्र सुरु करण्याकरिता जागा द्यावयाचे झाल्यास खालील अटी व शर्ती बधंनकारक राहतील.

अ) प्रशासकीय अटी व शर्ती :-

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (क) च्या तरतुदीनुसार ठरावाच्या माध्यमातून महानगरपालिकेची मंजूरी आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) च्या तरतुदीनुसार जो मोबदला घेऊन विषयांकीत जागा पट्टयाने दयावयाची आहे त्याचे भाडेमुल्य चालू बाजार किमतीपेक्षा कमी नसावे.

३. याबाबत संबंधित संस्थेबरोबर अटी व शर्ती नुसार योग्य तो करारनामा व जागा निश्चिती करण्याबाबतची कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना राहील.

४. वीज वापरासाठी स्वतंत्र मीटर बसविणे नॅकोफ इंडिया लिमिटेड या संस्थेस बंधनकारक असेल. त्याअनुषंगाने येणारी देयके अदा करणे त्या संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच सदर जेनेरीक औषधाच्या केंद्रातील सामान व साहित्य सामुग्रीच्या सुरक्षेची जबाबदारी संस्थेचीच राहील.

५. जन औषधी उपलब्ध नसल्यास इतर बँडेड अथवा जेनेरिक औषधी सदर संस्थेने उपलब्ध करून दयावी लागतील अशा वेळी ब्रँडेड औषधीच्या दर्शनी मुल्यावर ५% इतकी सवलत रुग्णांना देणे बंधनकारक राहील.

६. औषधी केंद्रास जागा अन्न व औषध प्रशासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे उपलब्ध करून देण्यात यावी.

ब) तांत्रिक अटी व शर्ती :-

१. संबंधित जिल्ह्याचा जिल्हा शल्यचिकित्सकाने रुग्णालय स्तरावर आवश्यक त्या अधिकारी / कर्मचारी व अन्न व औषध प्रशासनाचा प्रतिनिधी यांची एक समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती संबंधित संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या औषधी केंद्राचे कामकाजाचा दर एका वर्षांनी आढावा घेण्यात येईल. आणि त्याबाबतचा अहवाल आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना पाठविल.

२. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या नियमाप्रमाणे ज्या ठिकाणी औषध व्यवसाय करणे प्रस्तावित आहे. त्याच जागेसाठी विक्री परवाना घेणे बंधनकारक राहील.

३. संस्थेने नेमलेल्या औषध निर्मात्याने राज्याच्या फार्मसी कौन्सीलकडे नोंदणीकृत असणे व वेळोवेळी नोंदणी अद्ययावत करणे बंधनकारक राहील.

४. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या नियमाप्रमाणे पुरेशी जागा व औषधे साठविण्यासाठी वातानुकूलित व्यवस्था असणे आवश्यक आहे.

५. औषधांची विक्री करताना नॅशनल फार्मास्युटीकल प्रायसिंग अथॉरिटी च्या नियमाप्रमाणे किंमतीचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर औषधांच्या दुकानामध्ये बाहेरून येणाऱ्या प्रत्येक औषधांची नोंद नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे. तांत्रिक समितीकडून अशा नोंदवहीतील नोंदी व प्रत्यक्ष साठा यांची पडताळणी अधुनमधून करण्यात येईल.

७. नियुक्त केलेल्या तांत्रिक समितीकडून वरील सर्व तांत्रिक बाबींचे व नियमांचे काटेकोरपणे पालन होत असल्याबाबत सहामाही तपासणी करण्यात येईल व त्याचा अहवाल आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना सादर करावा.

८. औषध खरेदी, विक्री, साठवणूक, आवश्यक आर्थिक गुंतवणूक व त्या अनुषंगाने केंद्र चालविण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभी करण्याची जबाबदारी व त्यांच्या नियमातील तरतूदीनुसार या नॅकोफ इंडिया लिमिटेड या संस्थेची राहील.

क) इतर अटी व शर्ती :-

१. भाडे कराराचा कालावधी ११ महिन्याकरीता राहील.

२. जेनेरीक औषधीचे केंद्र तात्पुरत्या स्वरूपातील बांधकाम/ टिन शेड/ ॲल्युमिनियम शेड चे राहील.

३. ११ महिन्यानंतर भाडेकराराची मुदतवाढ करावयाची झाल्यास पुढील ११ महिन्याचे येणाऱ्या शुल्क/भाडे दरात १०% वाढ किंवा त्या चालु आर्थिक वर्षाच्या सिध्द शिघ्र गणकानुसार आकारण्यात आलेल्या दरा प्रमाणे यापैकी जे कमाल दर असतील त्या दरापासून आकारणी करण्यात येईल.

४. अर्जदार संस्थेस सदर जागेवरील औषधी केंद्र बंद करावयाचे असल्यास भाडेपट्टा रद्द करण्याबाबत तीन महिने पुर्वी महानगरपालिकेला सुचित करणे आवश्यक राहील.

५. म.न.पा. अंतर्गत सुरु असलेल्या दवाखान्यात, रुग्णालय परिसरात दुकान संबंधाने म.न.पा. व नॅकॉफ सोबत झालेल्या करारात वाद उपस्थित झाल्यास दोन्ही पक्ष सामंजस्याने वाद सोडविण्याचे प्रयत्न करतील पण तरीही निर्माण झालेला वाद सुटला नाही तर संबंधीत वाद मा. आयुक्त यांच्या समक्ष ठेवण्यात येईल व त्यांनी दिलेल्या निर्णय दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील.

६. अर्जदारसंस्थेस भाडेकरार नियमीत/सुरु झाल्यानंतर सदर्हु जागेत स्वतंत्ररित्या विजेचा पुरवठा अर्जदारसंस्थेस स्वतंत्ररित्या करुन घ्यावी लागेल. यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

७. नॅकॉफ यांनी ज्या रुग्णालयात जेनेरिक औषधी केंद्र सुरु केले आहे, तेथील वैद्यकीय अधिकारी त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित रुगालायातील औषध भांडार प्रमुख, प्रशासकीय अधिकारी, अन्न व औषध प्रशासन विभागाचा प्रतिनिधी असलेली समिती स्थापन करतील व ही समिती संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या औषधी केंद्राचा कामकाजाचा दर वर्षांनी आढावा घेईल व त्याबाबतचा अहवाल मा. आयुक्त नागपूर महानगरपालिका यांचे मार्फत शासनास करण्यात येईल.

८. नॅकॉफ यांनी कामाच्या ठिकाणी काही दुर्घटना, अपघात अथवा गैरप्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित व्यवस्थापक, नॅकॉफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई संस्थेची राहील. त्याकरिता नागपूर महानगरपालिका कोणती ही नुकसान भरपाई, वैद्यकीय मदत अथवा आर्थिक मदत करणार नाही. जेनेरिक औषधीच्या केंद्राची उभारणी करतेवेळी नागपूर महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई व्यवस्थापक, नॅकॉफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई संस्थेने करावयाची आहे.

९. नॅकॉफ संस्थेस ठरवून दिलेली मुदत संपुष्टात येईपर्यंत काम करणे बंधनकारक राहील.

१०. महाराष्ट्र शासन, केंद्र शासन तसेच मा. न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे, शासन निर्णयाचे परिपत्रक व आदेशाचे पालन करण्याची जवाबदारी व्यवस्थापक, नॅकोफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई या संस्थेची व नागपूर महानगरपालिका नागपूर यांची असून उक्तप्रमाणे वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार जेनेरिक औषधी पुरवठा करण्याचे अंमलबजावणी करणे व्यवस्थापक, नॅकोफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई यांचेवर बंधनकारक असेल.

११. सदरील करारनामा नागपूर न्यायक्षेत्राच्या आधीन राहून करण्यात येत आहे.

१२. नॅकोफ यांनी भाडयावर दिलेल्या जागेवर पोट भाडेकरू इत्यादी म.न.पा.च्या पूर्व परवानगीशिवाय ठेवू नये.

१३. दिलेल्या जागेत अर्जदारास बांधकाम स्थायी/अस्थायी करावयाचे असल्यास त्याबाबत नियमानूसार पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

१४. उपरोक्त अटी व शर्तीचे पालन व्यवस्थापक, नॅकोफ इंडिया लिमिटेड, शाखा मुंबई या संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच या करारातील अटी व शर्तीचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास उचित कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना राहतील.

१५. शासनाच्या आरोग्य संस्थामधील औषधे व NACOF च्या औषधी केंद्रातील औषधांमध्ये अदलाबदल तसेच परस्पर औषधांचा साठा संपला म्हणून काळाबाजार होणार नाही याची दक्षता घ्यावी, याचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास NACOF या संस्थेस काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल".

उक्त प्रमाणे नॅकॉफ यांना संबंधीत उक्त शासन निर्देशाचे अनुषंगाने जेनेरीक औषधी केंद्राकरीता रू. २६,४७७/- शुल्क/भाडे आकारून ११ महिन्याकरीता कमाल चौक, पाचपावली येथील रुग्णालयाच्या परिसरातील जागा उपलब्ध करून देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**